RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 22 मार्च 2026



1920- माणगांव कोल्हापूर अस्पृश्य परिषदेत छत्रपती शाहू महाराजांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे खूप कौतुक केले. संकलन प्रा. यशवंत दुपटे

रविवार, २२ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ८३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 22 March 2026 | Year : ६ | Issue : 83 | Daily | Rate: Rs. 5/-

# इराणच्या नतांज अणू प्रकल्पावर अमेरिका-इस्त्रायलचा भीषण हल्ला

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील तणाव दिवसेंदिवस वाढत जात असून आता इराणच्या नतांज परमाणु केंद्रावर भीषण हल्ला करण्यात आला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने संयुक्तपणे ही कारवाई केली असून यामुळे जगभर खळबळ माजली आहे.

इराणच्या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात नतांज संवर्धन केंद्राला निशाणा बनवलं आहे. हमल्याची तीव्रता इतकी भीषण होती की या हल्ल्याचा आवाज सर्वदूर पसरला होता. प्राथमिक तपासानंतर इराणी अधिकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. कारण आतापर्यंत कोणत्याही किरणोत्सर्गी पदार्थांची गळती झालेली नाही. याचा अर्थ अणू कचरा गळतीची सर्वांत मोठी भीती सध्यातरी नाही.

इराणी प्रसारमाध्यमांचा दावा आहे की



स्फोट होऊनही जवळच्या निवासी भागांतील रहिवासी सुरक्षित आहेत. सरकारने या लष्करी कारवाईचे वर्णन रणाचा अणुकार्यक्रम रोखण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या अमेरिका इस्त्रायल मोहिमेचा एक भाग असे केले आहे.

खरंतर नतांज अणूऊर्जा केंद्र हे शत्रूंचे नेहमीच लक्ष्य राहिले आहे. 2025 पासून या स्थळाला अनेकवेळा लक्ष्य करण्यात आले आहे. प्रत्येकवेळी पायाभूत सुविधा आणि यंत्रसामग्रीचे नुकसान झाले आहे. परंतु, सुदैवाने पर्यावरणाची कोणतीही मोठी हानी झालेली नाही.

वृत्तानुसार, इराणच्या लष्कराने शनिवारी इस्त्रायलच्या बेन गुरियन विमानतळावर विमानांना इंधन पुरवणाऱ्या टाक्यांवर ड्रोनद्वारे हल्ला केल्याचे सांगितले, असे देशाच्या सरकारी माध्यमांनी वृत्त दिले आहे.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धसमाप्तीचे संकेत दिलेले असताना इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी मात्र युद्धविराम होणार नसल्याचं स्पष्ट केलंय. जपानच्या क्योडो न्यूजला दिलेल्या मुलाखतीत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची म्हणाले की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबतचे युद्ध संपवण्यासाठी तेहरानला केवळ युद्धविरामापेक्षा अधिक काहीतरी लागेल. आमचा संदेश हा आहे की हे युद्ध आमचे नाही. ते आमच्यावर लादले गेले आहे. आम्ही अमेरिकेशी वाटाघाटी करत असतानाच त्यांनी आमच्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. हे आक्रमणाचे एक उघड कृत्य होते. बेकायदेशीर, अन्यायकारक आणि विनाकारण केलेले, असे अराघची म्हणाले. त्यांनी पुनरुच्चार केला, आमची भूमिका ही आहे की आम्ही युद्धविराम स्वीकारत नाही कारण गेल्या वर्षीची परिस्थिती पुन्हा निर्माण व्हावी असे आम्हाला वाटत नाही.

# महागाईचा परिणाम प्रत्येकाच्या खिशावर होणार हे निश्चित : राहुल गांधी

**नवी दिल्ली :** भारतीय रुपया अमेरिकी डॉलरच्या तुलनेत विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला आहे. कमकुवत होत असलेल्या रुपयाच्या सततच्या घसरणीबद्दल राहुल गांधींनी चिंता व्यक्त केली आहे. पश्चिम आशियातील जागतिक शक्तींमधील संघर्षामुळे निर्माण झालेल्या तणावामुळे महागाई वाढण्याचा इशारा देत, राहुल गांधींनी इन्स्टाग्रामवर एका सविस्तर पोस्टमध्ये लिहिले आहे. ते म्हणाले, सरकार परिस्थिती सामान्य असल्याचा दावा करू शकते, पण सत्य काही वेगळेच आहे. उद्योगात वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या वाढत्या किमतींचा संदर्भ देत त्यांनी लिहिले की, ही केवळ आकडेवारी नाही, तर येऊ घातलेल्या महागाईचे स्पष्ट संकेत आहेत.

राहुल गांधी यांनी निवडणुकांनंतर पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या (एलपीजी) किमती वाढतील अशी भीती व्यक्त केली आहे. आपल्या एक्स-पोस्टमध्ये त्यांनी येत्या काही दिवसांतील दरवाढीचा उल्लेख करत लिहिले आहे की, उत्पादन आणि वाहतूक अधिक महाग होईल.

राहुल गांधी असेही म्हणाले की, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) सर्वाधिक फटका बसेल. त्यांनी लिहिले, एमएसएमईंना सर्वाधिक फटका बसेल, दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढतील. येत्या काही दिवसांत शेअर बाजारावर होणाऱ्या परिणामाचा उल्लेख करताना राहुल गांधी म्हणाले की, एफआयआयंचा पैसा वेगाने बाहेर जाईल, ज्यामुळे शेअर बाजारावरील दबाव वाढेल.

पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीवरून केंद्र सरकारवर हल्लाबोल करत राहुल यांनी पुढे लिहिले, याचा प्रत्येक कुटुंबाच्या खिशावर थेट आणि खोलवर परिणाम होणार हे निश्चित आहे. निवडणुकांनंतर पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतीही वाढवल्या जातील. त्यांनी पुढे लिहिले, मोदी सरकारकडे ना दिशा आहे ना



रणनीती केवळ पोकळ शब्दांचा खेळ आहे. सरकार काय म्हणत आहे हा प्रश्न नाही प्रश्न हा आहे की तुमच्या ताटात काय उरले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, 28 फेब्रुवारी रोजी सुरू झालेला इराण-अमेरिका-इस्त्रायल संघर्ष गेल्या 22 दिवसांपासून सुरू आहे. या युद्धाची झळ आता केवळ आखाती देशांपुरतीच मर्यादित न राहता भारतापर्यंत पोहोचली आहे. भारताकडे येणाऱ्या तेल आणि वायूच्या जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करताना आव्हानांचा सामना करावा लागत आहे. भारतातून फळे आणि भाजीपाला निर्यात करणारे शेतकरीदेखील आव्हानांशी झुंजत आहेत. तज्ज्ञांच्या मते, जर लवकरच शांतता प्रस्थापित झाली नाही, तर पश्चिम आशियातील या संघर्षाचे दूरगामी परिणाम होतील.

## महत्त्वाच्या बातम्या

### रामदास आठवले यांचा उपवर्गीकरणाला पाठींबा

**नागपूर :** अनुसूचित जातींतील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर देशभरात सुरू असलेल्या चर्चेदरम्यान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपाइं (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी स्पष्टपणे उपवर्गीकरणाला पाठिंबा दर्शविला आहे. सर्व घटकांना समान न्याय मिळावा, हीच आपली भूमिका असल्याचे त्यांनी शनिवारी नागपुरात पत्रपरिषदेत बोलताना सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींतील उपवर्गीकरणास मान्यता दिल्यानंतर विविध राज्यांमध्ये समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातही समितीचा अहवाल राज्य सरकारला सादर झाला असून, त्यावर राज्यभरात मतभेद समोर येत आहेत. बौद्ध समाजातील विविध संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला आहे. अनुसूचित जातींमधील समाजाची नेमकी लोकसंख्या माहीत नसताना, वर्गवारी कशी करणार, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. याच्या विरोधात आंदोलनाचा इशाराही काही संघटनांनी दिला आहे. दुसरीकडे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी या उपवर्गीकरणाला समर्थन दिले आहे.



### भोंदू बाबासह भक्तांवरही कारवाई करा : उद्धव ठाकरे

**मुंबई :** अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील अशोक खरातला पोलिसांनी अटक केली आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. त्यानंतर अखेर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. याच भोंदू बाबा अशोक खरात बरोबर राज्यातील आणखी काही नेत्यांचेही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, अशोक खरात प्रकरणावर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाष्य करत 'भोंदू बाबासह भोंदू भक्तांवरही कारवाई करा', अशी मोठी मागणी केली आहे. तसेच राज्यातील राजकारण आणखी किती किती खालच्या स्तरावर नेणार आहात? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला आहे. महाराष्ट्र आणखी किती खालच्या स्तरावर नेणार आहात? महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायदा आहे. त्या कायद्याचं पालन करणारेच जर अशा प्रकारे भोंदू बाबाच्या नादी लागत असतील तर भोंदू बाबाच्या भक्तांवर देखील कारवाई झाली पाहिजे. जे राजकारणात भोंदू बाबाचे भक्त दिसत आहेत, त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वांची चौकशी करा, असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

### 'आता फक्त कथालेखन करणार' : माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे

**पुणे :** भारताचे माजी लष्करप्रमुख एम. एम. नरवणे यांच्या 'फोर स्टार ऑफ डेस्टिनी' या अप्रकाशित आत्मचरित्रावरून बराच गदारोळ उडाला. आत्मचरित्रामधील कथित उल्लेखांमुळे या आत्मचरित्राच्या प्रकाशनावर बंदी घातली गेली. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हा विषय संसदेत लावून धरला होता. यानंतर माजी लष्करप्रमुख यांनी यापुढे केवळ कथालेखन करणार असल्याचे म्हटले आहे. माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांना त्यांच्या भविष्यातील लेखनाच्या योजनांबद्दल विचारण्यात आले. त्यावर त्यांनी पत्रकारांना सांगितले की, ते सध्या केवळ कथा कादंबऱ्या लिहित आहेत.

मी वेळेवेळी वेगवेगळ्या पद्धतीचे लिखाण करत आलो आहे. केवळ लष्करी अहवालच नाही तर लष्कराच्या विविध शैक्षणिक नियतकालिकांसाठीही मी लिखाण केले आहे. मी काही लघुकथाही लिहिल्या होत्या.

## शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा!

**नागपूर :** राज्यातील शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी एक अत्यंत महत्वाची आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. जिल्हा परिषद आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची रिक्त पदे लवकरच 'पवित्र पोर्टल' द्वारे भरली जाणार आहेत. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी नुकत्याच झालेल्या एका महत्वपूर्ण बैठकीत ही माहिती दिली. खासगी शिक्षण संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती भरण्यापूर्वी मागासवर्गीय कक्ष आणि विभागीय आयुक्त कार्यालयाकडून 'रोस्टर' (बिंदूनामावली) प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच ही माहिती पोर्टलवर मागवली जाईल. पवित्र पोर्टलद्वारेच नियुक्त्यांना मान्यता केवळ पवित्र पोर्टलद्वारे भरलेल्या पदांनाच शासन मान्यता देणार असून, अशाच पदांना भविष्यात वेतन लागू केले जाईल. पारदर्शकता जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.



## रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करुन तातडीने अटक करा : रुपाली ठोंबरे पाटील

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाच्या राजीनामा दिलेल्या रुपाली चाकणकर यांच्या अटकेची मागणी केली. रुपाली चाकणकर यांचा भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणात राजीनामा घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा राजीनामा घेतल्याबद्दल आम्ही त्यांच्या आभारी आहोत. आता चाकणकरांना तात्काळ अटक केली पाहिजे. या रॅकेटच्या शेवटच्या धागापर्यंत पोहोचून या सगळ्यांना शिक्षा होण्यासाठी सर्व गोष्टींची चौकशी होणं गरजेचं आहे. रुपाली चाकणकर यांना सहआरोपी करुन तातडीने अटक करणं गरजेचं आहे, अशी भूमिका रुपाली ठोंबरे पाटील यांनी मांडली.



महाराष्ट्रातील माता-भगिनींवर जे अन्याय, अत्याचार झाले त्याला कारणीभूत राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर आहेत. त्यामुळे त्यांना तातडीने अटक करावी. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष पदावरुन पायउतार करण्याबाबत लवकरच निर्णय घेतील. कारण या प्रकरणामुळे पक्षाची बदनामी होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तातडीने महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा घ्यायला सांगितला. आता पक्षाच्या अध्यक्षा देखील चाकणकरांचा राजीनामा घेतील. ही मागणी सर्व पदाधिकाऱ्यांची आहे, असं रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या.

मी आरोप केलेले नाहीत, तर रुपाली चाकणकर यांच्या गुरुने महिलांचा शोषण केले आहे, तर चाकणकर यांनी या भोंदू बाबाला पदाचा गैरवापर करुन मदत केली. ते मी जगासमोर आणलं आहे. ते मी कोर्टासमोर आणणार आहे. तुम्हाला कोणत्या नोटीस पाठवायच्या आहेत ते पाठवा. मी पुरावे देणार. तुमचे काय संबंध होते त्याचे पुरावे देणार. असे रुपाली ठोंबरे पाटील यांनी म्हटले आहे.

## अधिकाऱ्यांसाठी रविनगरमध्ये उभारणार 15 मजली इमारत

**नागपूर :** अधिकाऱ्यांच्या निवासाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी रविनगर परिसरात जी प्लस 15 मजली उंच इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. या इमारतीसाठी राज्य सरकारने 43 कोटी 30 लाख रुपयांची मंजुरी दिली आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) असा दावा केला आहे की, पुढील दोन महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा प्रयत्न केला जाईल.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासाची समस्या सोडविण्यासाठी पीडब्ल्यहीने रविनगर परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ 5 हजार चौरस मीटर जागेवर उंच इमारत उभारण्याचा प्रस्ताव राज्य



सरकारकडे पाठवला होता. हा प्रस्ताव 67 कोटी रुपयांचा होता. मात्र, राज्य सरकारने या प्रस्तावात कपात करून 43 कोटी रुपयांची मंजरी दिली आहे.

त्यामुळे आता पीडब्ल्यूडीचे अधिकारी नव्याने अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामात गुंतले आहेत. विभागाच्या मते, हे नवीन अंदाजपत्रक मुख्य अभियंत्यांसमोर सादर केले जाईल. मंजुरी मिळताच निविदा प्रक्रिया सुरू केली जाईल.

## युद्धनौका 'तारागिरी' 3 एप्रिल रोजी होणार नौदलात दाखल

**नवी दिल्ली :** भारतीय नौदल 3 एप्रिल रोजी विशाखापट्टणम येथे आपल्या स्वदेशी बनावटीच्या तारागिरी या स्टेल्थ फ्रिगेटला सेवेत दाखल करणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह भूषवतील.

तारागिरी ही प्रोजेक्ट 17ए वर्गातील चौथी आणि मुंबईच्या माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड (एमडीएल) ने बांधलेली तिसरी युद्धनौका आहे. गेल्या वर्षी 28 नोव्हेंबर रोजी ती नौदलात दाखल झाली. ही 6,670 टन वजनाची फ्रिगेट मेक इन इंडियाची भावना आणि स्वदेशी अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतीक आहे. नौदलाच्या प्रवक्त्याने सांगितले, हा सोहळा भारताच्या सागरी सार्वभौमत्वासाठी एक निर्णायक क्षण असेल. ही युद्धनौका नौदल रचना, गुप्तता, मारक क्षमता आणि स्वयंचलित यंत्रणा यांमध्ये एक मोठी झेप दर्शवते. यात संयुक्त डिझेल किंवा गॅस



(CODOG) प्रणोदन प्रणाली आहे, जी उच्च गती आणि दीर्घकाळ टिकण्याची क्षमता प्रदान करते. तारागिरीची रचना बहुआयामी सागरी कार्यांसाठी करण्यात आली आहे. यात 75 टक्के स्वदेशी घटकांचा वापर केला आहे, ज्यामुळे 200 हून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) आधार मिळतो आणि हजारो भारतीय रोजगार निर्माण होतात.

तारागिरीचा शस्त्रसंच जागतिक दर्जाचा आहे. त्यात सुपरसॉनिक पृष्ठ-ते-पृष्ठ क्षेपणास्त्रे, मध्यम पल्ल्याची पृष्ठ-ते-हवा क्षेपणास्त्रे आणि एक विशेष पाणबुडीविरोधी युद्धप्रणाली यांचा समावेश आहे. या प्रणाली एका अत्याधुनिक लढाऊ व्यवस्थापन प्रणालीद्वारे एकात्मिक केल्या आहेत. ही फ्रिगेट पूर्वीच्या डिझाइनपेक्षा श्रेष्ठ आहे, कारण तिचा कमी रडार क्रॉस-सेक्शन तिला प्राणघातक गुप्ततेने कार्य करण्यास सक्षम करतो.

आपल्या लढाऊ भूमिकेव्यतिरिक्त, तारागिरी आधुनिक मुत्सद्देगिरी आणि मानवतावादी संकटांसाठीही तयार करण्यात आली आहे. तिच्या लवचिक मोहिमेमुळे ती तीव्र युद्धापासून ते मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारणापर्यंत सर्व गोष्टींसाठी आदर्श ठरते. ती भारतीय नौदलाला एक आत्मनिर्भर दल म्हणून विकसित होण्यास हातभार लावते. तारागिरी एका विकसित आणि समृद्ध भारतासाठी सागरी सीमांचे संरक्षण करण्यास सज्ज आहे.







# नैतिक नेतृत्व की सामाजिक दांभिकता ?




भारताने जगात नैतिक नेतृत्व करावे, अशी भूमिका मोहन भागवत यांनी मांडली आहे. भारताची ‘वसुधैव कुटुंबकम्’ ही परंपरा, अहिंसा आणि सहअस्तित्वाची मूल्ये यामुळे हा दावा आकर्षक वाटतो. परंतु या दाव्याचा गंभीरपणे विचार करताना एक मूलभूत प्रश्न समोर येतो, ज्या समाजात अजूनही जातीय विषमता जिवंत आहे, तो समाज खरोखरच जागतिक नैतिक नेतृत्व करू शकतो का?

**वास्तव आणि भाषणातील दरी :-** स्वातंत्र्याला 77 वर्षे पूर्ण झाली असली तरी भारतीय समाजातील जातीय विभाजन पूर्णतः नाहीसे झालेले नाही. शिक्षण, रोजगार, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेत सूक्ष्म किंवा उघड स्वरूपात भेदभावाचे अस्तित्व दिसून येते. भारतीय राज्यघटनेने समानतेची हमी दिली आहे, तरीही सामाजिक वास्तव अनेकदा वेगळे चित्र दाखवते. भारतीय संविधानाचे कलम 14 - कायद्यापुढे सर्व समान. भारतीय संविधानाचे कलम 15 - भेदभावास मनाई. भारतीय संविधानाचे कलम 16 - समान संधी. भारतीय संविधानाचे कलम 17 - अस्पृश्यतेचे उच्चाटन. या तरतुदी असूनही, सामाजिक विषमता अजूनही टिकून आहे. त्यामुळे ‘जागतिक शांततेचे नेतृत्व’ या घोषणांमध्ये आणि जमिनीवरील वास्तवामध्ये एक स्पष्ट दरी दिसते.

**वैचारिक पायाभूत प्रश्न :-** भारतीय समाजाच्या ऐतिहासिक रचनेत मनुस्मृती सारख्या ग्रंथांचा प्रभाव मानला जातो. या ग्रंथांमध्ये वर्णव्यवस्थेला मान्यता देण्यात आली होती. आधुनिक लोकशाही मूल्ये आणि संविधानिक तत्त्वे मात्र समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांवर आधारलेली आहेत. यामुळेच प्रश्न उभा राहतो, आपण कोणत्या मूल्यांच्या आधारावर जगाचे नेतृत्व करणार आहोत? परंपरेतील श्रेणीबद्धता की संविधानातील समानता?

**घटनात्मक नैतिकता आणि न्यायालयीन दृष्टिकोन :-** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने अनेक ऐतिहासिक खटल्यांत समानतेच्या तत्त्वावर भर दिला आहे. इंद्रा साहनी वि. युनियन ऑफ इंडिया, स्टेट ऑफ केरळ वि. एन. एम. थॉमस, नवतेज सिंग जोहार वि. युनियन ऑफ इंडिया. या निर्णयांमधून ‘घटनात्मक नैतिकता’ ही संकल्पना पुढे आली. म्हणजे समाजातील प्रचलित रूढींपेक्षा संविधानातील मूल्यांना प्राधान्य देणे.

**भारताची जागतिक भूमिका आणि अंतर्गत आव्हाने :-** भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता, सहकार्य आणि विकास यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्याची क्षमता निश्चितच आहे. परंतु त्यासाठी अंतर्गत सामाजिक न्याय अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

**गेल्या काही दशकांत भारताने महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे :-** आरक्षण धोरणांमुळे प्रतिनिधित्व वाढले, कायदेशीर संरक्षण मजबूत झाले, शिक्षणाचा प्रसार वाढला तरीही काही आव्हाने कायम आहेत, सामाजिक समानतेचा अभाव, प्रशासनातील असमतोल, संधींचे असमान वितरण.



ॲड.डॉ. सिद्धार्थ कांबळे
मुख्य संपादक

**खरे नैतिक नेतृत्व कसे असावे? :-** जागतिक पातळीवर नैतिक नेतृत्वाचा दावा करण्यासाठी केवळ विचारसरणी किंवा भाषण पुरेसे नसते. त्यासाठी देशांतर्गत पातळीवर न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठा सुनिश्चित करणे आवश्यक असते. भारताची खरी ताकद त्याच्या प्राचीन परंपरेत जितकी आहे, तितकीच ती त्याच्या संविधानातही आहे. भारताने जगाचे नैतिक नेतृत्व करावे, ही कल्पना नाकारण्यासारखी नाही. परंतु त्या नेतृत्वाची पायाभरणी केवळ घोषणांवर नव्हे, तर सामाजिक वास्तवात बदल घडवून आणण्यावर अवलंबून आहे. जातीय अन्याय, विषमता आणि भेदभाव संपविल्याशिवाय ‘नैतिक नेतृत्व’ हा दावा अपूर्ण राहील. भारत खरोखरच जगाचे मार्गदर्शन करू शकतो, परंतु त्यासाठी प्रथम स्वतःच्या समाजात समानतेचे तत्त्व पूर्णपणे रुजवणे आवश्यक आहे. ■■

# बुद्ध विहार समन्वय दिवस दरवर्षी एक महाविहार

सर्व प्रथम वाचकाना आणि भारतीयांना कांशीराम साहेबांच्या जयंती आणि बुद्ध विहार समन्वय दिवसाच्या हार्दिक मंगल कामना व्यक्त करतो. 15 मार्च हा दिवस फार महत्त्वाचा आहे. बहुजन नायक कांशीराम साहेब यांचा तो जयंती दिवस आहे. मी सतत त्या दिवशी कुठे तरी कार्यक्रमात सहभागी राहत होतो. मी माझा जन्म दिवस पार विसरून गेलो होतो. 15 मार्च माझा देखील जन्मदिवस आहे. माझी बायको आणि मुले माझा दिवस साजरा करीत. चांदूर बाजार येथील जी. आर. काबरा विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात शिकत असताना माझ्या शाळेत मी स्कूल कॅप्टन होतो तेव्हा माझा जन्मदिवस साजरा करण्यात आला होता. मी सायकलरिक्षा चालक संघटना चालवत होतो. एकदा त्या संघटनेने माझा जन्म दिवस साजरा केला होता. ज्ञानेश्वर गणवीर, अनिल बोरकर, पाटील इत्यादी रिक्षा चालक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यावेळी त्यांनी मला डॉ. रावसाहेब कसबे लिखित भारतीय संविधान परिचय देणारा ग्रंथ भेट दिला होता. बुद्ध विहार समन्वय समितीचे कार्य 2014 ला सुरू झाले. काही आदरणीय कार्यकर्ते एक दिवस 500 रुपयाचा पुष्पगुच्छ घेऊन घरी आले. मी म्हणालो हे 500/-रू. आपले व्यर्थ गेले. याचा समाजाला काही लाभ नाही. मी त्यांना म्हणालो, आपण आज सर्वजण 100/-रू. समितीला दान देऊ. कारण मी म्हणजे बुद्ध विहार समन्वय अभियान. आपली स्वतंत्र ओळख नसते. आपले काम आपल्याला ओळख देतात. सन्मान देतात. मला लोक समाजकार्यामुळे ओळखतात. ते कार्य जर बाजूला काढले तर मी शून्य ठरेल. कोणी ओळखणार नाही. म्हणून माझ्या समाजकार्याला अनुमोदन, सहकार्य, सहभाग म्हणजे माझा सन्मान होय. व्यक्तीपूजेने काही प्राप्त होत नाही. त्यापेक्षा कर्तव्य जास्त महत्वाचे आहे. त्याला प्रतिसाद म्हणून मागचे वर्षी 12 लोकांनी 1200/-रू. समितीला दिले. ते अमरावतीच्या पूर्णवेळ युवक कार्यकर्त्याला दान दिले. त्यापूर्वी 9 लोकांनी 900 रू समितीला दान दिले. यावर्षी मात्र समितीने मुंबई येथे आयोजित बुद्ध विहार राष्ट्रीय चौथ्या अधिवेशनात 15 मार्च हा ‘बुद्ध विहार समन्वय दिवस’ साजरा करण्याचे जाहीर केले. त्यासाठी एक योजना सुरू करण्यात आली. एक लाख लोकांनी दरवर्षी 15 मार्च पासून 31 जानेवारीपर्यंत केवळ 100/- वर्षदान समितीचे खात्यात QR कोडद्वारे पाठवावे. त्यातून एक करोड रुपये समितीला दान गोळा होईल. त्या एक करोड रुपयात दरवर्षी भारतातील कोणत्याही एका जिल्ह्यात एक बुद्ध विहार निर्माण करू. ते विहार संघाला दान करू. त्या विहारात बुद्ध विहार संस्कृती निर्माण करू. योग्यता असलेले विद्वान बौद्ध भिक्खू त्या विहाराचे संचालक असतील. समिती त्यांना सहकार्य करेल. त्या विहारावर सर्व बौद्ध समाजाचा हक्क असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संकल्पनेतील ते विहार असेल. तेथे शाळा किंवा दवाखाना किंवा वृद्धाश्रम असे जे सेवाभावी उपक्रम आहेत त्यापैकी एक एका विहारात सुरू करण्यात येईल. हे अभियान अविरत सुरु राहिले तर भारताच्या प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श विहार निर्माण होईल. ते विहार त्या त्या जिल्ह्यातील सर्व लहान मोठ्या, विकसित अविकसित



विहारांचे मुख्यालय, मार्गदर्शक, समन्वयक आणि मदतनीस म्हणून काम करीत राहील. प्रश्न असा आहे की एक लाख लोक तयार होतील का? याचे उत्तर आहे ते तयार करावे लागेल. आतापर्यंत जगात आपोआप काहीच झाले नाही, होत नसते आणि होणार देखील नाही. त्यासाठी योजना बनऊन ती राबविण्याची यंत्रणा निर्माण करावी लागेल. यासाठी समितीने ती योजना बनवली आणि यंत्रणा देखील निर्माण करण्याची सुरुवात केली. एक लाख 100 रू. चे कुपन छापण्यात आले आहेत. त्याचे 1000 पॅड तयार करण्यात आले. एका पॅड मधून 100 दात्यांना कुपन देण्यात येतील. अशा 1000 पॅड मधून एक लाख लोकांनी ते कुपन घेतले असेल. त्यातून एक करोड रुपये दान गोळा होईल. देशातील 1000कार्यकर्ते दहा महिने हे काम करीत राहतील. प्रत्येक जण त्यांचे मित्र, नातेवाईक, शेजारी, कार्यकर्ते, ओळखीचे लोक अशा 100 लोकांना ते विनंती करतील आणि दान राशी जमा करतील. सध्या जे बुद्ध विहार आहेत त्यात बुद्ध विहार संस्कृती निर्माण झाली नाही. त्याबद्दल त्या लोकांना कुणी शिकवले नाही. बुद्ध विहार संस्कृती संबंधी समाजात जाणीव जागृती देखील नाही. विहार चालविण्याकरिता आपण आपल्या राजकीय शत्रूला भीक मागून आपली चळवळ गहाण ठेवतो. त्याला पर्याय देण्यासाठी देखील हे स्वाभिमानी पाऊल आहे. केवळ विरोध करून, दोष देऊन उपयोग नसतो. दुसरा मुद्दा म्हणजे भारतात सर्व जिल्ह्यात आंबेडकरी चळवळ नाही. या माध्यमातून तेथे आंबेडकरी चळवळीला प्रवेश करण्यात मार्ग मिळू शकेल. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, हरियाणा, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, दिल्ली या ठिकाणी आंबेडकरी चळवळीची सुरुवात झाली आहे. परंतु इतर राज्यात अभाव आहे. या योजनेतून तो अभाव कमी करता येईल. तिसरा मुद्दा म्हणजे येणाऱ्या काळात सरकारी नोकऱ्या मिळतील याची खात्री नाही. त्यामुळे दान देणारा नोकरदार वर्ग कमी होईल. शंभर रुपये हे अत्यल्प दान असल्याने गरीब श्रमिक लोक देखील तेवढी राशी दान करू शकतात. समाजाला ती संवय लावली पाहिजे. ती प्रक्रिया या अभियानामुळे सुरू होईल. चौथा मुद्दा म्हणजे समाज इश्युवर एकत्र येत असतो. भारतातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी एक महाविहार निर्मिती केवळ एक लाख लोकांचे प्रत्येकी 100/- दानात होणे हा एक स्वाभिमानी उपक्रम आहे. त्या माध्यमातून देशातील एक लाख लोकाचा समन्वय होऊ शकतो. पाचवा मुद्दा म्हणजे आंबेडकरी आणि बौद्ध समाजाला आपली संघ शक्ती अपेक्षित आहे. नेत्यांना अपेक्षित असो की नसो. परंतु स्वार्थी तत्त्वांचे विभाजन भूमिकेने लोक हैराण आहेत. या उपक्रमाने स्वाभिमानी बाणा दाखवून एक लाख लोक जर एखादे अभियान यशस्वी करण्यासाठी एकत्र येत असतील तर समाजाचे मनोबल वाढीस लागते आणि ते संघटित होण्यासाठी प्रयत्न करतात. त्यामुळे आपली संघ शक्ती वाढेल. सहावा मुद्दा म्हणजे हे अभियान लहान आणि मर्यादित दिसत असले तरी त्याचे परिणाम दुरगामी दिसून येतील. एक हजार सामान्य कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी होणे ही मोठी उपलब्धी ठरेल. आपल्या ध्येयसिद्धीसाठी हे कार्यकर्ते वर्षभर कार्यरत राहतील. हे कार्य त्यांचेकरीता सहज आणि सोपे आहे. त्यांना दहा महिन्यात केवळ शंभर लोकांचे सहकार्य मिळविणे आहे. एका महिन्यात केवळ दहा लोकांचे लक्ष दिले आहे. त्यातून हे हजार लोक मोठ्या आणि पवित्र लक्ष प्राप्त करण्यासाठी काम करू शकतील. यासाठी त्यांना कुणाचा विरोध करण्याची गरज नाही. कुणाचे नेतृत्व मानण्याची गरज नाही. कुण्या संघटनेसाठी, कुण्या नेत्यासाठी, कुण्या व्यक्तीसाठी हे अभियान कुणाला राबवायचे नाही. ते आपल्यासाठी, आपल्या धर्मासाठी, आपल्या संघशक्तीसाठी, आपल्या स्वप्नपूर्तीसाठी, भारत बौद्धमय करण्यासाठी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी राबवायचे आहे. हे लोकांचे लक्षात जर आले तर हे अभियान समाजाचा चेहरा बदलू शकेल. म्हणून प्रत्येकाने या अभियानात सहभागी व्हावे. कुणाला काहीही गमावण्याची गरज नाही. कुणाचे काहीच नुकसान नाही. केवळ एक दक्षता घ्यावी लागेल. कुणाच्याही बहकाव्यात येता कामा नये. कारण समाजात असा एक वर्ग निर्माण झाला की तो करीत काहीच नाही पण जे काही चांगले होत असेल त्या ईर्शेमुळे त्याला विरोध करण्यासाठी ते प्राण पणास लावतात. अशा आत्मघातकी निष्क्रीय लोकांपासून आपण सर्वांनी सावध राहावे. आपण सर्वजण सम्यक संकल्प करूया आणि आपले भवितव्य आपणच सुरक्षित करूया. या लहान लहान प्रकल्पातून आपला विकास होईल. ■■

लेखांक 149



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

बुद्ध विहार समन्वय समिती
BUDDHA VIHAR SAMANWAY SAMITI NAGPUR
बँक अकाऊंट नंबर A/c 876910510000361
IFC CODE BKID0008769
BANK OF INDIA, khamla,Nagpur
बँक ऑफ इंडिया खामला नागपूर



QR CODE Scanner for Payment

# ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मण महाड धर्मसंगराच्या निमित्ताने ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 19 व 20 मार्च 1927 रोजी महाड येथे उभारलेल्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला धर्मसंगर असे नाव देऊन त्याचे वर्णन समतेच्या तत्वासाठी मांडलेल्या धर्म युद्धातील पहिले रणकंदन अशा शब्दात केले होते. ती समता प्रस्थापित होऊ न देण्यासाठी ब्राम्हण्यग्रस्त आरएसएसच्या मुखंडानी जे नवनवीन प्रकार अवलंबिले त्यापैकी समरसता मंच ब्राम्हणांचे सर्व पातळ्यांवर वर्चस्व अबाधित ठेवण्यात सद्यःस्थितीत यशस्वी ठरल्याचे दिसून येत आहे. या कलाबाजीमुळे डॉ. बाबासाहेबांच्या जातींच्या निर्मूलनाशिवाय समता प्रस्थापित होणे शक्य नाही. या विचारांना आपोआप ब्रेक लागला आहे. म्हणून महाड क्रांती दिनाच्या शताब्दी वर्षानिमित्ताने आपला भूतकाळ न विसरता ब्राह्मण्यग्रस्त ब्राम्हणांनी पूनर्स्थापित केलेले वर्चस्व संपवून टाकण्यासाठी संघटनात्मक उपायांची आवश्यकता आहे.



डॉ. बाबासाहेबांचा महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह हा अस्पृश्यांचा स्वाभिमान जागृत करून हिरावून घेतलेल्या मानवी हक्कांसाठी होता. परंतु हा मानवमुक्तीचा लढा ब्राम्हण्यग्रस्त ब्राम्हणी विचारांच्या आड येत असल्याने या विचारांचे मानसिक गुलाम महारांनी तळे बाटविल्याच्या ब्राम्हणांच्या हाकाटीला शरण गेले. डॉ. बाबासाहेबांनी अनुयायांना शांत राहण्यास भाग पाडल्यामुळे मारहाणीचा प्रसंग उद्भवल्यानंतरही अस्पृश्यांनी त्याचा प्रतिकार केला नाही. या संदर्भात डॉ. बाबासाहेब मानसिक गुलामांना इशारा देऊन म्हणाले, आम्ही मनात आणले असते तर आम्हालाही तुमच्या पाठी सडकून काढता आल्या असत्या. डॉ. बाबासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे ब्राम्हण्यग्रस्त ब्राम्हणेतर ब्राम्हणांचे बिनपगारी पोलीस आहेत. ही परिस्थिती आज काहीशी शिथील झाली असेल, परंतु बदललेली नाही.

चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्यावेळी अस्पृश्यांवर झालेल्या हल्ल्याचा मराठा समाजाचे केशवराव जेधे व दिनकराव जवळकर यांनी निषेध करून आम्ही तुमच्या बरोबर येण्यास तयार आहोत, पुन्हा सत्याग्रह करा, असे पत्राद्वारे कळविले होते. हा सत्याग्रह कसा करावा याविषयी त्यांच्या काही सुचना त्यांनी मांडलेल्या होत्या. त्यापैकी सत्याग्रह यशस्वी होण्यासाठी कसलाही ब्राम्हण त्यात समाविष्ट करून घेऊ नये, ही त्यांची अट होती. डॉ. बाबासाहेबांच्या सत्याग्रहात त्यांच्या विचारांशी जुळलेले ब्राम्हण समाजाचे बापूराव सहस्त्रबुद्धे आणि कमलाकर टिपणीस, कमलाकांत चित्रे कायस्थ समाजाचे व इतरही काही सहकारी सामील झाले होते. डॉ. बाबासाहेबांना ब्राम्हण्यग्रस्तांचा विरोध होता, ब्राम्हणांचा नव्हे. त्यामुळे हे सर्व ब्राह्मण सहकारी त्यांच्या सोबत होते. त्याचप्रमाणे महाड परिषद यशस्वी करण्यासाठी व मारहाणीत जखमी झालेल्यांना मदत करण्याच्या कार्यात येथील चांद्रसेनीय कायस्थ जातीतील तरूणांनी परिश्रम घेतले होते, हेही नमूद केले गेले आहे. त्याबद्दल कुलाबा जिल्हा अस्पृश्य वर्ग सदैव त्यांचा ऋणी राहील, अशा प्रकारे त्यांचे आभार मानण्यात आले होते. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांशी अनुकूल ब्राम्हण त्यांच्या चळवळीत सामील होते, ही त्यावेळची स्थिती होती. असे पुरोगामी ब्राम्हण आज नगण्य झाले आहेत. ज्या ब्राम्हण्यग्रस्त विचारांची पेरणी ब्राम्हणेतरांमध्ये करण्यात येत होती, त्याने तेही ग्रस्तीत झाल्याचे आजचे चित्र आहे. पुष्कळशे मग तो उजवा असो की, डावा सर्वांवर अधिसत्ता गाजवायच्या उद्देशाने आरएसएस व भाजपमध्ये एकवटलेले आहेत. इतरांच्या प्रगतीचा विचार त्यांच्या मनात काटा रूतल्याप्रमाणे सलतो. अधून मधून हिंदू राष्ट्राचा जो स्वर उमटतो, त्यावरून पेशवाईप्रमाणे अनिर्बंध व निरंकुश सत्ता स्थापीत करण्याचे मनसुबे उघड होत आहेत. म्हणून आजचे ब्राम्हण सर्वात जास्त ब्राम्हण्यग्रस्त असल्याचे निदर्शनास येते. डॉ. बाबासाहेबांचे जागृतीचा ज्वालामुखी विझू देऊ नका, असे पोटतिडकीने सांगणे विस्मरणात गेल्याने चळवळ संपली. संघर्ष संपला. यात काहीही साध्य करू न शकणारी भाषणबाजी तितकी शिल्लक आहे.

जोगेंद्र सरदारे
मो. 9422138322

म्हणून आजचे वास्तव समजून सुज्ञानी समाजाचा एक घटक म्हणून एकत्रित भूमिका घेणे आवश्यक आहे. अन्यथा खोल दरीत ढकलले जाण्याची भीती ज्यांचे जीवनमान अजून उंचावले नाही, त्यांच्याकरीता नक्की आहे. महाड क्रांती दिनाच्या निमित्त ती चेतना आजच्या परिस्थितीत परत पेटविली पाहिजे तरच आम्ही महाड क्रांती सोबत प्रामाणिक राहू. ■■

# व्हॉट्सॲपवरील वादातून सामाजिक वास्तवाचा वेध




डिजिटल युगात बोटांच्या टोकांवर धावणारी मैत्री, नात्यांचे धूसर होत जाणारे रंग, मतभेदांचे अनपेक्षित वादळ आणि त्यामागचे सामाजिक वास्तव, या साऱ्यांचे एकत्रित चित्र उभे करणारे पंकज रंगारी यांचे "Removed From WhatsApp" हे पुस्तक वाचकाला विचारांच्या नव्या प्रवासावर घेऊन जाते. ही कथा एका WhatsApp गटातील किरकोळ वाटणाऱ्या वादातून सुरू होते; मात्र पुढे जाताना ती तरुणांच्या मनातील अस्वस्थता, प्रश्नांची धग आणि आरक्षणासारख्या ज्वलंत सामाजिक विषयाच्या अनेक स्तरांना स्पर्श करते. लेखकाची शैली ताजी, धारदार आणि संवेदनशील आहे. विशेष म्हणजे, त्यांनी कोणत्याही एका बाजूचा अतिरेकी आग्रह धरला नसून दोन्ही बाजूंना समान न्याय देणारा संतुलित दृष्टिकोन स्वीकारला आहे. कथा शाळेतील मित्रांच्या डिजिटल पुनर्मिलनाने सुरू होते. चोवीस वर्षांनंतर पुन्हा एकत्र आलेले हे मित्र जुन्या आठवणींना उजाळा देतात. वातावरण आनंदी असतानाच, आरक्षणावरील एका संदेशामुळे अचानक वादाची ठिणगी पडते आणि ‘बंधुता’ या मूल्यालाच प्रश्न निर्माण होतो, जे आपल्या संविधानाच्या प्रस्तावनेतील एक मूलभूत तत्त्व आहे. या वादातून नायकाचा वैचारिक प्रवास सुरू होतो. आरक्षणाची संकल्पना समजून घेण्यापासून ते विरोधी मतांविषयी सहानुभूती निर्माण करण्यापर्यंतचा हा प्रवास अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. शेवटी प्रत्यक्ष पुनर्मिलनात तो ‘मैत्री हीच खरी affirmative action आहे’ असे म्हणत मानवी नात्यांचे महत्त्व अधोरेखित करतो. पुस्तकातील पात्रे विविध सामाजिक पार्श्वभूमीतून आलेली आहेत आणि प्रत्येकाचे विचार वेगळे आहेत. नायक NM आणि त्याचा मार्गदर्शक KK हे आंबेडकरी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात, तर इतर पात्रांमधून समाजातील विविध मतप्रवाह जिवंतपणे उभे राहतात. या सर्वांच्या संवादातून आरक्षण, जातव्यवस्था, ‘मेरिट’चा प्रश्न आणि सामाजिक न्याय या विषयांवर सखोल चर्चा घडते. पुस्तकाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जागतिक Affirmative Action चा आढावा. अमेरिका, दक्षिण आफ्रिका, ब्राझील, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि मलेशिया यांसारख्या देशांतील धोरणांची तुलना करताना लेखक दाखवतो की सामाजिक विषमता ही केवळ भारतापुरती मर्यादित नाही. ऐतिहासिक अन्यायाची भरपाई करण्यासाठी अशा उपाययोजना जागतिक पातळीवर आवश्यक ठरतात. आरक्षणाविषयी समाजात प्रचलित असलेल्या गैरसमजांनाही लेखकाने तर्कसंगत पद्धतीने हाताळले आहे. ‘मेरिट’, ‘समता’, ‘कालमर्यादा’ आणि ‘स्पर्धात्मकता’ यांसारख्या मुद्द्यांवर तो अभ्यासपूर्ण आणि संतुलित भूमिका मांडतो. लेखनशैली साधी, प्रवाही आणि प्रभावी आहे. कथनातील वास्तवता, पात्रांची जिवंत मांडणी आणि संवेदनशील विषयांवरील सखोल विचार यामुळे हे पुस्तक केवळ वाचनापुरते मर्यादित राहत नाही, तर वाचकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते. हे पुस्तक वाचकाला केवळ माहिती देत नाही, तर संवादाची नवी दृष्टी देते, मतभेद असतानाही परस्पर सन्मान कसा टिकवायचा, हे शिकवते. विविधतेतून एकता साधण्याचा संदेश देत हे पुस्तक आजच्या भारताच्या सामाजिक वास्तवाचे प्रामाणिक चित्र उभे करते. समारोप एकंदरीत, "Removed From WhatsApp" हे पुस्तक आरक्षण, जात आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर सखोल आणि संतुलित भाष्य करणारे महत्त्वपूर्ण साहित्य आहे. संवाद, समज आणि बंधुता यांचा नवा अर्थ उलगडत हे पुस्तक वाचकाला विचार करायला भाग पाडते. समकालीन भारत समजून घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे एक अनिवार्य वाचन ठरते. ■■

शीर्षक : Removed From WhatsApp – A Bitter Tale of Caste & Reservation : Two Perspectives, One Nation
लेखक : पंकज रंगारी
प्रकार : साहित्यिक कादंबरी / सामाजिक थ्रिलर
शब्दसंख्या : सुमारे 34,000
प्रकाशन : 28 डिसेंबर 2025, नागपूर

# रमजान ईद
## नव समानतेचा, बंधुत्वाचा आणि माणुसकीचा उत्सव

रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा अत्यंत पवित्र आणि प्रमुख सण असून, तो श्रद्धा, संयम आणि माणुसकीच्या मूल्यांचा अद्वितीय संगम मानला जातो. जगभरातील मुस्लिम बांधव हा सण मोठ्या उत्साहाने, आनंदाने आणि श्रद्धेने साजरा करतात. समाजातील सौहार्द वृद्धिंगत करणे, परस्परांतील आपुलकी वाढवणे आणि कौटुंबिक तसेच सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ करणे, या दृष्टीने ईदचे विशेष महत्त्व आहे. चांदण्याच्या कोवळ्या प्रकाशात जेव्हा ईदचा चंद्र दिसतो, तेव्हा तो केवळ एका सणाची सुरुवात दर्शवत नाही, तर नव्या आशा, नव्या उमेदी आणि नव्या मानवतेच्या पहाटेचे प्रतिक ठरतो. रमजान महिन्याचा शेवट होताच संयम, त्याग आणि साधनेने शुद्ध झालेली अंतःकरणे आनंदाच्या तेजाने उजळून निघतात. म्हणूनच ईद हा केवळ उत्सव नसून, तो समानता, बंधुत्व आणि प्रेम यांचा जिवंत संदेश देणारा एक व्यापक जीवनमूल्य आहे. रमजान हा केवळ उपवासाचा महिना नसून आत्मशुद्धी, आत्मपरीक्षण, संयम आणि अंतर्मुखतेचा काळ आहे. या महिन्यात प्रत्येक मुस्लिम बांधव पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत ‘रोजा’ पाळतो. मात्र हा रोजा केवळ अन्न-पाण्याचा त्याग नसून, तो मन, वाणी आणि आचरण यांवर नियंत्रण ठेवण्याची एक सखोल साधना आहे. वाईट विचार, वाईट कृती आणि नकारात्मक भावनांपासून स्वतःला दूर ठेवत, सकारात्मकतेकडे वाटचाल करण्याचा हा कालखंड असतो.



उपाशी राहण्याच्या अनुभवातून इतरांच्या भुकेची, त्यांच्या वेदनांची जाणीव होते. हीच जाणीव पुढे दयाळूपणा, सहानुभूती आणि दानशूरतेत परिवर्तित होते. समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांप्रती कर्तव्यभाव निर्माण होतो. ‘जकात’ आणि ‘फित्रा’ या स्वरूपात दान देण्याची परंपरा या काळात विशेषत्वाने पाळली जाते, जी समाजातील आर्थिक आणि सामाजिक समतोल राखण्यास सहाय्यभूत ठरते.

ईद हा या संपूर्ण साधनेचा आनंदोत्सव आहे. या दिवशी गरीब-श्रीमंत, मोठा-लहान, आपला-परका असे सर्व भेद विरघळून जातात. सर्वजण एकमेकांना ‘ईद मुबारक’ म्हणून शुभेच्छा देतात, गळाभेट घेतात आणि मनातील कटुता दूर करून नव्याने नातेसंबंध जुळवतात. या स्नेहसंमेलनातून समाजात एकतेचा, समानतेचा आणि बंधुत्वाचा प्रभावी संदेश दिला जातो.

ईदच्या दिवशी सर्वजण ईदगाह किंवा मशिदीत जाऊन नमाज अदा करतात. त्या क्षणी प्रत्येक व्यक्ती फक्त ‘माणूस’ म्हणून उभा राहतो. नाही कुठलाही भेद, नाही कुठलीही दरी. प्रत्येकाच्या अंतःकरणात प्रेम, शांतता आणि सद्भावना नांदत असते. हीच ईदची खरी ओळख आहे. मानवतेची, समतेची आणि ऐक्याची. हा सण केवळ नवीन कपडे परिधान करणे, शीरखुर्मा किंवा बिर्याणीचा आस्वाद घेणे, अथवा आनंदमयी भेटीगाठी यापुरता मर्यादित नाही. तो माणुसकीचा आणि बंधुत्वाचा खरा उत्सव आहे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत, जिथे तणाव, असहिष्णुता आणि विभाजनाची छाया वाढताना दिसते, तेथे ईदचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. ईद आपल्याला शिकवते की खरी समृद्धी वस्तूंमध्ये नसून नात्यांमध्ये आहे; खरी प्रगती स्पर्धेत नसून सहकार्यामध्ये आहे आणि खरा आनंद स्वतःसाठी जगण्यात नसून इतरांसाठी काहीतरी करण्यामध्ये आहे. जर प्रत्येकाने आपल्या मनात थोडासा ‘रमजान’ जागवला, तर समाजातील कटुता, द्वेष आणि भेदभाव आपोआपच कमी होईल. ईद ही केवळ एका धर्माची मर्यादा नसून, ती एक सार्वत्रिक मूल्य आहे. प्रत्येक व्यक्तीला आपलेसे मानणे, त्याच्या आनंदात सहभागी होणे आणि दुःखात त्याला आधार देणे. हीच खरी ईद साजरी करण्याची पद्धत आहे. कारण ईद आपल्याला केवळ सण साजरा करायला शिकवत नाही, तर खऱ्या अर्थाने ‘माणूस’ बनायला शिकवते.

चला, या ईदला आपण केवळ एक सण म्हणून नव्हे, तर एक जिवंत मूल्य म्हणून स्वीकारूया, समानतेचा, बंधुत्वाचा आणि अखंड माणुसकीचा संदेश देणारा एक पवित्र उत्सव म्हणून. आपल्या मनामध्ये क्षमा, दया आणि प्रेम यांचे वास होऊ दे; आपण आनंद वाटूया, नात्यांना जपूया आणि प्रत्येक क्षण सकारात्मकतेने आणि प्रसन्नतेने जगूया, हीच या पवित्र सणानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. ईद मुबारक! ■■

– मनीषा आनंदराव कांबळे

# एका धम्म प्रचारकाची असीम छाया
## दिवंगत शिलाताई चंद्रबोधी पाटील

भारतीय बौद्ध महासभा अर्थात ‘दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया’चे राष्ट्रीय अध्यक्ष मान्यवर चंद्रबोधी पाटील साहेब आणि मी दीक्षाभूमी, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे समकालीन विद्यार्थी होतो. त्यांचे घनिष्ठ मित्र मा. डी. डी. कांबळे, मा. हिराभाऊ शेंडे, मा. भीमराव कांबळे हे माझे वर्गमित्र होते. 1972 मध्ये बी.कॉम. पूर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षण किंवा नोकरीच्या निमित्ताने सर्व मित्रमंडळी विभक्त झाली.



याच दरम्यान आदरणीय चंद्रबोधी पाटील हे 1979 मध्ये ‘बँक ऑफ महाराष्ट्र’ या राष्ट्रीयीकृत बँकेत भोपाळ (मध्यप्रदेश) येथे स्थायिक झाले. योगायोग असा की, कॉलेज जीवनातील अनेक मित्र भोपाळमध्ये विविध शासकीय कार्यालयांत एकत्र आले. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने प्रेरित ही तरुण मंडळी मा. मोहनलाल पाटील, मा. गौतम पाटील, मा. बी. टी. गजभिये, मनोज माणिक, चिंतामण पगारे, यु. जी. चवरे, एन. एम. कांबळे, अशोक पाटील, शंकर तायडे, धर्मदास ओ. कांबळे इत्यादी मा. चंद्रबोधी पाटील यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक व धार्मिक कार्य करू लागली. भोपाळमध्ये जणू विदर्भाचा प्रभाव दिसू लागला आणि याच ठिकाणी त्यांच्या नेतृत्वगुणांना खरी सुरुवात झाली.

**शिलाताईची मानसिक जडणघडण :-** 17 मे 1981 रोजी शिलाताई राजाराम गजभिये या सुस्वभावी, सुविज्ञ व सोज्वळ मुलीशी त्यांचा विवाह झाला. शिलाताई फार उच्च शिक्षित नव्हत्या; त्या इंटरपर्यंत शिक्षण घेतलेल्या होत्या. नागपूरजवळील दिघोरीसारख्या खेड्यातील साधी परिस्थिती, मोठा परिवार–दोन बहिणी, एक भाऊ, आई-वडील यामुळे त्यांना उच्च शिक्षण घेता आले नाही.

तथापि, ‘आपण उच्च शिक्षित नाही’ हा न्यूनगंड त्यांनी कधी बाळगला नाही. त्या म्हणायच्या, ‘गाडगेबाबा दोन वर्ग शिकले, रमाई आई एकही वर्ग शिकल्या नाहीत; तरी त्यांनी समाजसेवा केली. मी तर इंटर पास आहे, मला का नाही जमणार?’ या उदात्त विचारांनी त्यांनी स्वतःला घडवले आणि प्रगल्भ विचारसरणी स्वीकारली.

स्त्रीत्वाची जाणीव, आशा-अपेक्षा आणि काही प्रमाणात उपेक्षा, या साऱ्या मानसिक अवस्थांतून त्यांनी जवळपास एक तप प्रवास केला. निश्चलपणे आणि निर्विकारपणे त्यांनी धम्मकार्याला स्वतःला वाहून घेतले. 12 वर्षे अपत्यहीन जीवन जगताना त्यांनी वेदना संयमाने स्वीकारल्या आणि त्यातून निर्माण झालेली अस्मिता आयुष्यभर जपली, हीच त्यांची महानता आहे.

**संघर्षमय काळ :-** 1983 मध्ये मा. चंद्रबोधी पाटील यांची ‘दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया’च्या मध्यप्रदेश राज्याध्यक्षपदी नियुक्ती झाली. 1982 ते 1992 या काळात शिलाताईंना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. साध्या दोन खोल्यांच्या घरात संसार सांभाळत असताना सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कार्यकर्त्यांची ये-जा त्यांनी हसतमुखाने स्वीकारली.

1991 मध्ये भोपाळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या विध्वंसाविरोधात मोठा मोर्चा काढण्यात आला. पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये शिलाताईंना अटक झाली. त्यांच्या समोरच पाटील साहेबांना अमानुष मारहाण झाली आणि त्यांना 11 दिवस सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आले. अशा भयावह परिस्थितीतही शिलाताईंनी धैर्याने पतीच्या पाठीशी उभे राहून सहधम्मचारिणीचे कर्तव्य पार पाडले.

**मातृत्व आणि सामाजिक कार्य :-** 1993 मध्ये त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. मातृत्वानंतरही त्यांनी स्वतःला घरापुरते मर्यादित न ठेवता महिलांना संघटित करण्याचे कार्य सुरू ठेवले. भोपाळमधील विविध विहारांमध्ये त्यांनी ‘करुणा बुद्ध विहार’ केंद्रस्थानी ठेवून कार्य विस्तारले.

‘प्रबुद्ध महिला मंडळ’, ‘रमाई महिला मंडळ’, ‘रमाई महिला ब्रिगेड’ यांसारख्या संघटनांद्वारे त्यांनी महिलांना बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारात सक्रिय केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक महिला कार्यकर्त्या खांद्याला खांदा लावून काम करू लागल्या. शिलाताई या सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत ठरल्या.

**असीम छाया :-** 2001 मध्ये मा. चंद्रबोधी पाटील राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या. देशभर दौरे करताना शिलाताई त्यांच्यासोबत सावलीप्रमाणे राहिल्या. विविध परिषद, अधिवेशने आणि धम्म मेळाव्यांमध्ये त्यांनी महिला व्यवस्थापनाची जबाबदारी अत्यंत सहजतेने पार पाडली. त्यांच्या वागणुकीत कधीही पदाचा अहंकार नव्हता; त्या साधेपणाने आणि समर्पणाने कार्य करत राहिल्या. एका धम्म प्रचारकाची सतत सोबत करणारी ‘असीम छाया’ म्हणून त्यांनी आयुष्यभर धम्मसेवा केली.

**मनाला चटका लावणारा निरोप :-** कोविड-19 महामारीच्या दुसऱ्या लाटेत 21 मार्च 2021 रोजी शिलाताईंचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून न निघणारी आहे. 27 डिसेंबर 2020 रोजी ‘शब्द फुलांची ओंजळ’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी त्यांची झालेली भेट ही अखेरची ठरली.

माझे कविमन आजही म्हणते,
‘दिसत नाही कोठेच आसपास,
कसं यावं आम्ही तुम्हा भेटण्यास’?

जीवन अनित्य आहे; प्रेम, माया, राग, लोभ सर्व नश्वर आहे. तरीही जीवनाचा प्रवास अखंड सुरूच असतो. त्या वाटेवर आपण सर्व प्रवासी आहोत.

शिलाताईंची कार्यप्रेरणा पुढील पिढ्यांना धम्मचेतना देत राहील, हा विश्वास व्यक्त करून ही शब्दफुले त्यांच्या स्मृतीस अर्पण करतो. ■■

– अनिलकुमार मेश्राम
अध्यक्ष विदर्भ प्रवेश
दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया

“ कष्ट एवढ्या शांततेत करा की, यश गजर करेल... ”



# जयंतीची तयारी : विचारप्रधान, शिस्तबद्ध...

**नागपुरातील भारतीय रिझर्व बँक, विधान सभा भवन जवळील संविधान चौक येथे गेल्या अनेक वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे सार्वजनिक आयोजन अत्यंत सुंदर शिस्तबद्ध पद्धतीने केल्या जाते. हा आदर्श घेण्यासारखा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर विचारांची परिक्रमा आहे. 14 एप्रिल हा दिवस लाखो अनुयायांसाठी प्रेरणा, स्वाभिमान आणि सामाजिक बांधिलकीची आठवण करून देणारा असतो.**

या दिवशी आपण केवळ अभिवादन करत नाही, तर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांशी आपली निष्ठा दृढ करतो. अलीकडच्या काळात जयंती साजरी करण्याच्या पद्धतींमध्ये मोठे बदल झाले आहेत. भव्य मिरवणुका, रोषणाई, डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि शक्तीप्रदर्शन यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. परंतु या जल्लोषात डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची गांभीर्यपूर्ण मांडणी अनेकदा मागे पडताना दिसते. म्हणूनच 'डीजे-मुक्त जयंती' हा विचार आज अधिक महत्त्वाचा ठरत आहे. हा उत्सव थांबवण्याचा नव्हे, तर त्याला सुसंस्कृत आणि विधायक दिशा देण्याचा प्रयत्न आहे.

**विचारांची गती आणि प्रसार :** डॉ. बाबासाहेबांचा विचार हळूहळू, पण सातत्याने समाजात पसरत आहे. विविध भाषांमध्ये आंबेडकरी साहित्याचे वाचन, संशोधन आणि अभ्यास वाढत आहे. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या त्यांच्या त्रिसूत्रीचा प्रभाव नव्या पिढीवर पडत आहे. विचारांचा प्रसार हा केवळ घोषणांनी होत नाही; तो वाचन, चिंतन आणि आचरणातून घडतो. माणुसकीच्या परिवर्तनाचा खरा अजेंडा म्हणजे आंबेडकरी साहित्य. 'Annihilation of Caste (जातिभेदाचा नाश)', 'Who Were the Shudras? (शूद्र कोण होते?)', आणि 'The Buddha and His Dhamma (बुद्ध आणि त्यांचा धम्म)' यांसारख्या ग्रंथांचे सामूहिक वाचन जयंतीदिनी झाले, तर समाज अधिक जागरूक आणि विवेकनिष्ठ बनेल. जयंतीची तयारी म्हणजे केवळ स्टेज उभारणे नव्हे, तर विचारांची मांडणी करण्यासाठी बौद्धिक मंच तयार करणे होय.



विलास गजभिये
मो. 9421588901

**नागपूरची भूमिका आणि संयुक्त तयारी :** नुकतीच दीक्षाभूमी येथे संयुक्त जयंती साजरी करण्यासंदर्भात सहविचार सभा झाली. या चर्चेतून 'डीजे-मुक्त जयंती' या संकल्पनेला नवी चालना मिळाली. नागपूर शहरात जाहीर सभा, चौक सभा, विचारमंच आयोजित करून डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्णय घेण्यात आला. दीक्षाभूमी ही केवळ ऐतिहासिक स्थळ नाही; ती परिवर्तनाची भूमी आहे. त्या भूमीवरून निघणारा संदेश शांतता, शिस्त आणि बौद्धिकता यांचा असतो. त्यामुळे जयंतीची तयारीही त्याच धर्तीवर व्हावी, ही अपेक्षा आहे.

**जयंतीचा खरा अर्थ :-** डॉ. बाबासाहेबांनी आयुष्यभर शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीवर भर दिला. त्यांचा संदेश ज्ञान, शिस्त आणि नैतिकतेचा होता. जयंती हा दिवस त्यांच्या विचारांचे वाचन, चिंतन आणि आचरण करण्याचा असायला हवा. परंतु काही ठिकाणी जयंतीचा अर्थ केवळ नाचगाणे, मोठ्या आवाजातील गाणी आणि शक्तीप्रदर्शन इतकाच उरतो. अशा प्रकारच्या साजरीकरणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थी यांना त्रास होतो. सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण होते. डीजे-मुक्त जयंतीचा उद्देश उत्सवावर बंधन आणणे नाही, तर त्याला विवेकपूर्ण दिशा देणे आहे. डॉ. बाबासाहेबांचा विचार कर्णकर्कश आवाजात हरवू नये, हीच भूमिका आहे.



**संविधानिक मूल्यांची जपणूक :-** भारतीय राज्यघटना ही डॉ. बाबासाहेबांची सर्वात मोठी देणगी आहे. राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा पुरस्कार करण्यात आला आहे. जयंतीच्या निमित्ताने आपण या मूल्यांचे स्मरण ठेवतो का, की केवळ बाह्य दिखाव्यात रमतो? ध्वनीप्रदूषण हा देखील गंभीर सामाजिक प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनीप्रदूषणासंदर्भात नियम घालून दिले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी कायद्याचा सन्मान करायला शिकवले. मग त्यांच्या जयंतीदिवशीच कायद्याचे उल्लंघन करणे योग्य कसे ठरेल? डीजे-मुक्त जयंती म्हणजे राज्यघटनेतील मूल्यांशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न होय.

**विचारांची मिरवणूक हवी, आवाजाची नाही :-** महू (भीमजन्मभूमी), मुंबई येथील चैत्यभूमी, तसेच दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेश आणि दक्षिण भारतातील विविध ठिकाणी दरवर्षी लाखो अनुयायी अभिवादनासाठी जमतात. तेथे दिसणारी शिस्त, श्रद्धा आणि विचारांवरील निष्ठा प्रेरणादायी असते. त्याच धर्तीवर प्रत्येक गावात आणि शहरात जयंती साजरी झाली पाहिजे. डीजे ऐवजी ग्रंथमार्च, विचारमंच, व्याख्याने, परिसंवाद, रक्तदान शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती उपक्रम, वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रम आयोजित करता येतात.

**तरुणांची भूमिका :** जयंतीच्या आयोजनात तरुणांचा मोठा सहभाग असतो. त्यांची ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवणे आवश्यक आहे. डीजे-मुक्त जयंती म्हणजे तरुणांच्या उत्साहावर बंधन नव्हे, तर त्याला सर्जनशील दिशा देणे होय. मोटारसायकल रॅलीऐवजी सायकल रॅली, रक्तदान शिबिरे, करिअर मार्गदर्शन, डिजिटल पोस्टर स्पर्धा, संविधान वाचन स्पर्धा आणि सामाजिक बांधिलकी निधी संकलन असे उपक्रम अधिक अर्थपूर्ण ठरू शकतात. डॉ. बाबासाहेबांचे विचार सोशल मीडियावर विधायक पद्धतीने प्रसारित करणे ही आधुनिक काळातील मोठी सेवा आहे. चुकीची माहिती किंवा द्वेषमूलक पोस्ट टाळून सकारात्मक संदेश देणे हीच खरी जयंती साजरी करण्याची पद्धत आहे. जयंती उत्सवात महिलांचा सहभाग वाढवणे आवश्यक आहे. महिला बचत गट आणि स्वयंसहायता गट यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिरे, कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम, महिला सक्षमीकरण कार्यशाळा आयोजित करता येतात. ज्येष्ठ नागरिकांच्या अनुभवकथनातून तरुणांना प्रेरणा मिळू शकते. डीजे-मुक्त जयंतीमुळे सर्व वयोगटांना सहभागी होण्याची संधी मिळते. त्रिशरण आणि पंचशीलाचे पठण जयंती अधिक अर्थपूर्ण बनवते.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार :-** नवीन उद्योजक, व्यावसायिक आणि व्यापाऱ्यांचा गौरव, रक्तदान व आरोग्य शिबिरे पुस्तक व चित्रप्रदर्शन, युवकांसाठी करिअर मार्गदर्शन, महिला सक्षमीकरण कार्यशाळा, वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती हे उपक्रम केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता वर्षभर सुरू ठेवले, तर जयंतीचा खरा अर्थ साध्य होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती हा केवळ एका समाजाचा उत्सव नाही; तो संपूर्ण राष्ट्राचा अभिमान आहे. त्यांनी सर्व समाजघटकांसाठी कार्य केले. त्यामुळे जयंती साजरी करताना कोणत्याही प्रकारचा संघर्ष, वाद किंवा आक्षेपार्ह वर्तन होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. गावपातळीवर ग्रामपंचायत, पोलीस प्रशासन आणि सामाजिक संस्था यांच्या समन्वयातून नियोजन झाले, तर जयंती अधिक शिस्तबद्ध होऊ शकते. निधीचा अपव्यय टाळून तो शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी वापरला, तर डॉ. बाबासाहेबांच्या स्वप्नातील सुशिक्षित समाज घडविण्यास हातभार लागेल. जयंतीचा जल्लोष आवाजात नव्हे, तर विचारात असावा. डीजे-मुक्त जयंती म्हणजे उत्सवावर बंधन नव्हे, तर त्याला सुसंस्कृत, विधायक आणि संविधाननिष्ठ दिशा देणे होय. डॉ. बाबासाहेबांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. या त्रिसूत्रीचा अंगीकार करून, कायद्याचा सन्मान राखून आणि सामाजिक सलोखा जपत आपण जयंती साजरी केली, तरच ती त्यांना खरी आदरांजली ठरेल. शांत, शिस्तबद्ध आणि विचारप्रधान जयंती हीच आजच्या काळाची गरज आहे. डॉ. बाबासाहेबांच्या स्वप्नातील समतामूलक भारत घडविण्याचा संकल्प या दिवशी करू या ! ■ ■

# संतांचा महाराष्ट्र भोंदूंच्या विळख्यात !

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभलेली आहे. संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, सेना महाराज, जगनाडे महाराज, गोरोबाकाका, सावता महाराज इथपासून तर आधुनिक काळात संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशी महान सुधारणावादी संत परंपरा या महाराष्ट्राने पाहिलेली आहे. या संतांच्या प्रबोधनामुळेच महाराष्ट्राने देशाला दिशा दिलेली आहे. या संतांच्या अध्यात्मिक, सामाजिक कार्यापासून प्रेरणा घेऊनच अनेक महापुरुषांनी या महाराष्ट्राची वैचारिक, सामाजिक, शैक्षणिक उभारणी केलेली आहे. अशा या प्रगल्भ महाराष्ट्रात भोंदू, चमत्कारी, व्यभिचारी बाबांचे प्रचंड पीक मागील काही वर्षात आलेले आहे. त्यांना असलेल्या राजाश्रयामुळे भोंदूंचे हे विषारी पीक दिवसेंदिवस वाढू लागले आहे आणि त्यामध्ये आमचा महाराष्ट्र होरपळून निघत आहे. अध्यात्माच्या नावाखाली सुरू असलेली ही विकृती महाराष्ट्राच्या महान संत विचारांचा अपमान करणारी आहे. आमच्या संतांनी सांगितलेल्या खऱ्या भक्तिमार्गाचा चेंदामेंदा करणारी आहे. तरीसुद्धा या महाराष्ट्रात सामाजिक भान आणि जाण असलेले मोजकेच लोक वगळता संपूर्ण सुशिक्षित समाज तोंडावर बोट ठेवून गप्प आहे ही फार खेदाची बाब आहे. कॅप्टन अशोक खरात नावाच्या भोंदू बाबाचे किळसवाने प्रकरण नुकतेच उजेडात आले आहे. पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याच्या जवळील पेन ड्राईव्हमध्ये 58 धक्कादायक अश्लील व्हिडिओ सापडले आहे. सर्वात लज्जास्पद गोष्ट म्हणजे महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर या भोंदू बाबाच्या कट्टर भक्त आहे. त्यांच्या ट्रस्टमध्ये त्या सहभागी आहे. एका स्थानिक पत्रकाराने काही दिवसापूर्वी या भोंदू बाबाचा भंडाफोड करणारी बातमी छापली असताना रूपाली चाकणकरांनी त्या पत्रकारावर दबाव आणला होता. जिथे महिला आयोगाची अध्यक्षच या व्यभिचारी, बलात्कारी बाबाची भक्त आहे; तिथे सर्वसामान्य पीडित महिलांना कसा न्याय मिळणार? महाराष्ट्रात लहान मुली आणि महिलांवर होणारे अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस प्रचंड वाढत आहे. कुठे ॲसिड हल्ला, कुठे हुंडाबळी, कुठे भोंदू बाबांकडून शोषण या सगळ्या गोष्टींमुळे महाराष्ट्राची मान खाली जात आहे. एवढी उज्वल संत परंपरा महाराष्ट्राला लाभलेली असताना आमच्या भगिनी या नालायक, व्यभिचारी बाबांकडे का जातात हा सुद्धा चिंतनाचा प्रश्न आहे. जनतेची प्रचंड गर्दी या बाबांच्या सत्संगाला असल्यामुळे राजकारणी लोकही त्या गर्दीचा फायदा घेण्यासाठी अशा बाबांच्या दरबारात हजेरी लावतात. त्यामुळे आपोआपच या बाबाचे महत्त्व वाढते आणि त्याच्या वलयाला भाळून सामान्य जनता त्याच्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवते. आसाराम, रामरहीम, रामपाल, नित्यानंद हे बलात्कारी बाबा सुद्धा सुरुवातीला प्रचंड लोकप्रिय होते व त्यांनाही राजाश्रय होता. काही महिलांनी तक्रार केल्यामुळे त्यांचा भंडाफोड होऊन त्यांना तुरुंगाची हवा खावी लागली. परंतु तोपर्यंत असंख्य महिलांचे शोषण होऊन गेलेले असते. या सगळ्या भोंदू बाबांच्या मागे लागणाऱ्या महिला या सुशिक्षित आहे ही फार दुःखाची आणि चिंतेची बाब आहे. शिक्षित असूनही जर या महिला अशा अडाणी, अशिक्षित अघोरी बाबांच्या खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवून त्यांच्या जाळ्यात अडकत असेल तर त्याला जबाबदार कोण हा प्रश्न सुद्धा महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रात अशा चमत्कारी, ढोंगी भोंदू बाबांच्या विरोधात पुरोगामी विचारांची मंडळी सातत्याने प्रबोधन करीत असते. अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. शाममानव यांच्या अथक प्रयत्नातून जादूटोणा विरोधी बिल सुद्धा महाराष्ट्रात पारित झाले आहे. सत्यपाल महाराज आणि त्यांच्या मुशीतून तयार झालेले अनेक सप्तखंजरी वादक प्रबोधनकार, वेगवेगळ्या सामाजिक संघटनांचे व्याख्याते, लेखक, पत्रकार सातत्याने या भोंदू बाबांच्या विरोधात प्रबोधन करीत असतात. तरीसुद्धा लोकांचा विशेषतः महिलांचा ओढा या व्यभिचारी बाबांकडे जास्त आहे. सध्या लोकांच्या मनाची स्थिती अस्थिर आहे. त्यांना भीतीने आणि नैराश्याने ग्रासले आहे. अशावेळी अशा भोंदू बाबांच्या अंगारे, धुपारे, प्रसाद, आशीर्वादामध्ये लोक मानसिक आधार शोधत असतात आणि लोकांच्या या कमजोरीचा फायदा हे बुवाबापू बरोबर उचलतात. त्यातूनच अशोक खरातसारखा नालायक माणूस तयार होतो. महाराजांचे मूत्रप्राशन करण्याची सुद्धा तयारी जर आमच्या महिलांमध्ये असेल तर आता कोणत्या पद्धतीचे प्रबोधन करावे हा प्रश्न प्रबोधनकारांसमोर निर्माण झाला आहे. सरकार नावाची यंत्रणा सुद्धा या भोंदू बुवा, बाबांसमोर हतबल असून अनेक राजकीय पक्षाचे नेते या बुवाबापूंच्या नादी लागलेले आहे. संत गाडगेबाबा, तुकडोजी बाबांनी आयुष्यभर आपल्या प्रवचन, कीर्तनातून या चमत्कारी, भोंदू बाबांवर आसूड ओढलेले आहे. परंतु लोकांना शेंडगाव आणि मोझरीला जायला वेळ नाही आणि या अस्सल सुधारणावादी संतांचा विचार स्वीकारायला सुशिक्षित वर्गाची मानसिकता नाही. सुशिक्षित वर्गाला या परिवर्तनवादी संतांपेक्षा चमत्कारी संतांवर जास्त विश्वास आहे. त्यामुळे मेंदू गहाण ठेवलेल्या लोकांच्या कुटुंबात हे भोंदू बाबा सहज प्रवेश करतात आणि त्यांच्या घरातील महिला आपल्या जाळ्यात ओढतात. लक्षात येईपर्यंत वेळ निघून गेलेला असतो. शेवटी पश्चातापाशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या खऱ्या संत परंपरेवर विश्वास असणाऱ्या सर्व सामाजिक संघटनांच्या लोकांनी, विचारवंतांनी एकत्र बसून या गंभीर विषयावर चिंतन करून काहीतरी तोडगा शोधला पाहिजे. अन्यथा थोर संतांचा म्हणून ओळखला जाणारा हा महाराष्ट्र एक दिवस भोंदू, व्यभिचारी बाबांचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जाईल. ■ ■





प्रेमकुमार बोके
9527912706

# आंबेडकरी चळवळ समजून घेताना...

**आंबेडकरी चळवळ उभी करताना ज्या कर्तृत्ववान माणसांनी आपली हयात खर्ची घातली, त्या माणसांना भेटणे आणि त्यांच्या मनात घर करून राहणे ही गोष्ट सर्वांना लाभत नाही. मात्र, माझ्या आयुष्यात ते दोन दिवस अगदी मंतरलेले होते. जेव्हा मी आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार पँथर ज. वि. पवार यांच्या अगदी सहवासात होतो.**

मला त्यांच्या प्रत्येक शब्दाला ऐकता येत होते, त्याला प्रतिसाद देता येत होता. कित्येक गोष्टी त्यांनी आम्हाला सांगितल्या, ज्या कधीही कोणत्याही पुस्तकात लिहिल्या गेल्या नाहीत, पण त्या चळवळीच्या अनुषंगाने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. अशा प्रत्येक गोष्टी ऐकताना मी अगदी जीवाचे कान करून ऐकत होतो. काय लिहावे आणि कसे लिहावे हेच सुचेनासे झाले. पण त्या पँथरला अनुभवणे माझ्यासाठी आनंदाची पर्वणीच होती. चळवळ त्या लोकांकडून समजून घेणे, ज्यांनी चळवळ जगली आणि जपली, अशा लोकांकडून जर चळवळ समजली, तर ती आयुष्यभर लक्षात राहते आणि त्या चळवळीवरील निष्ठा, श्रद्धा आणि विश्वास अधिक दृढ होतो. यवतमाळ जिल्ह्यातील नेर येथे 8 मार्च रोजी पार पडलेल्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनासाठी 7 मार्चला मी सकाळी अमरावतीला येत होतो. 'आपल्याला ज. वि. पवार सरांना घेऊन यवतमाळला जायचे आहे, तू सकाळी तयार राहा,' अशी आदेशवजा सूचना प्रा. भारत शिरसाट सरांनी 5 मार्च रोजी दिली. त्या क्षणापासूनच मनात आनंदाचे उधाण आले होते. ज्या पँथरने अख्ख्या महाराष्ट्राला हादरे दिले, त्या दलित पँथर चळवळीचे क्रांतिकारी नेते ज. वि. पवार यांचे नाव मी आधी ऐकले होते, पण आता त्यांच्यासोबत दोन दिवस घालवण्याची संधी मिळणार होती. ही माझ्या सामाजिक आणि राजकीय कार्यासाठी अत्यंत ऊर्जादायी बाब होती. 6 मार्च रोजी अमरावतीच्या भीमटेकडीवर त्यांचे व्याख्यान ऐकले. त्यांच्या क्रांतिकारी जीवनातील प्रत्येक प्रसंग ऐकताना अंगावर शहारे येत होते. रात्री उशिरापर्यंत त्या विचारांची वादळे मनात घोंघावत होती. 7 मार्चला सकाळी 10.30 वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात पोहोचलो. गेस्ट हाऊसमध्ये ज. वि. पवार सर थांबले होते. चळवळीतील जुने-जाणते आणि नवखे कार्यकर्ते भेटत होते. प्रत्येकजण एक फोटो आणि काही शब्द आपल्या आयुष्यात साठवण्याचा प्रयत्न करत होता आणि त्या सगळ्यांशी अत्यंत आपुलकीने संवाद साधणारे ज. वि. सर खऱ्या अर्थाने हिमालयाएवढे व्यक्तिमत्त्व! त्यानंतर प्रा. भारत शिरसाट, अनंत भवरे आणि मी असे आम्ही यवतमाळकडे निघालो. प्रवासात त्यांनी सांगितलेल्या अनेक गोष्टी कधी ऐकलेल्या नव्हत्या, ना वाचलेल्या. नामदेव ढसाळ यांचा जीवनपट, रामदास आठवले यांचा सुरुवातीचा काळ, राजा ढाले यांच्यासोबतच्या आठवणी, सगळे ऐकताना मी भारावून गेलो होतो. चर्चेदरम्यान एक क्षण असा आला की ज. वि. सर म्हणाले, 'अरे भारत, आता फार काही विचारू नको... काही गोष्टी न सांगितलेल्या बऱ्या. त्या माझ्यासोबतच जाणार आहेत.' त्या क्षणी एका पँथरचे जगणे किती खोल आणि वेदनादायी असते, याची जाणीव झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतरच्या काळातील संघर्ष, माईसाहेब आंबेडकर यांच्यावरील आरोप-प्रत्यारोप आणि त्या काळात आंबेडकर कुटुंबाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणारे ज. वि. पवार हे चित्र माझ्या डोळ्यासमोर उभे राहत होते. (पुढील भागात यवतमाळचा प्रवास, बैठका, संवाद, आणि भावनिक प्रसंग याच प्रवाहात मांडले आहेत, मजकूर सुसंगत आणि प्रवाही ठेवून.) (समारोप) ज. वि. पवार सर आंबेडकर कुटुंबाचे पक्के आधारस्तंभ आहेत. त्यांना फोडण्याचे प्रयत्न झाले असतील, पदांची आमिषे आली असतील, पण त्यांनी कधीही स्वार्थाचा विचार केला नाही. स्वतःवर जीवघेणा हल्ला सहन करूनही त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबाशी निष्ठा राखली. म्हणूनच ते आंबेडकरोत्तर चळवळीचे खरे भाष्यकार ठरतात. आमच्यासारख्या तरुणांसाठी ते फक्त नेते नाहीत, तर खरे हिरो आहेत! ■ ■





सागर भवते
मो. 985052868

# मन सुन्न करणारी सत्य घटना

**पुणे-नाशिक हायवेवरच्या नारायणगाव बायपासला एक जुनी, पत्रे निघालेली मारुती व्हॅन उभी असायची. त्यावर लाल रंगाने मोफत रुग्णवाहिका (Free Ambulance) असे लिहिले होते. तिचा मालक होता दामू अण्णा. वय 60 च्या आसपास. अंगावर मळका खाकी शर्ट, वाढलेली दाढी आणि हातात एक स्टीलचा डबा. दामू अण्णा हायवेवर थांबणाऱ्या गाड्यांच्या खिडकीवर टक-टक करायचे.**

'साहेब, 10-20 रुपये द्या हो. डिझेलला पैसे नाहीत. एखादा पेशंट आला तर गाडीत तेल नसते. द्या हो धर्माच्या नावाने.' लोक त्यांना शिव्या द्यायचे. 'ए हट! दारू प्यायला पैसे मागतोयस का? मोफत सेवा लिहीलीये आणि पैसे मागतोयस? नक्कीच धंदा मांडलाय याने.' काही तरुण मुले तर त्यांची चेष्टा करायची. 'काय अण्णा, आज किती जमा झाले? चालते का ही भंगार गाडी? का ढकलत न्यावी लागते?' दामू अण्णा काहीच बोलायचे नाहीत. ते मान खाली घालून, लोकांच्या शिव्या गिळून, मिळालेले 10-20 रुपये गोळा करायचे आणि पंपावर जाऊन डिझेल टाकायचे. स्वतः चहा सुद्धा प्यायचे नाहीत.

एक दिवस रात्री 2 वाजता, त्याच हायवेवर 'रोहित' नावाचा एक श्रीमंत तरुण आपल्या स्पोर्ट्स बाईकवरून सुसाट चालला होता. त्याला पार्टीला उशीर झाला होता. अचानक एका वळणावर रस्ता निसरडा असल्याने त्याची बाईक घसरली. रोहित 20 फूट लांब फरफटत गेला. त्याचे हेल्मेट फूटले, डोक्यातून रक्ताच्या धारा लागल्या. पायाचे हाड मोडले होते. तो रस्त्याच्या कडेला विव्हळत पडला होता. रात्रीचे 2 वाजले होते. हायवेवर गाड्या तुरळक होत्या. ज्या गाड्या जात होत्या, त्या थांबत नव्हत्या. कोणाला पोलीस केसची भीती होती, तर कोणाला लुटालुटीची. रोहितचा जीव जात होता. त्याला डोळ्यासमोर अंधारी येत होती. त्याने विचार केला, 'संपले सगळे. आज आपण मरणार.' तेवढ्यात. दूरवरून एक कर्कश सायरन वाजला. तीच जुनी, पत्रे निघालेली 'दामू अण्णांची ॲम्ब्युलन्स' तिथे येऊन थांबली. दामू अण्णा धावत खाली उतरले. त्यांनी रोहितला रक्ताच्या थारोळ्यात पाहिले. त्यांच्या शरीरात हत्तीचे बळ आले. त्यांनी त्या 6 फूटाच्या धिप्पाड रोहितला एकट्याने उचलले आणि स्ट्रेचरवर टाकले. 'घाबरू नकोस बाळा. मी आहे. तुला काही होऊ देणार नाही.' दामू अण्णांनी गाडी स्टार्ट केली. पण गाडी 'खुरखुर' करून बंद पडली. रोहित शुद्धीवर होता, तो म्हणाला, 'काय झाले?' 'दामू अण्णांचे हात थरथरले.'डिझेल संपलेय राजा. मगाशी कोणी पैसे दिले नाहीत. फक्त 50 रुपयांचे टाकले होते.' रोहितला रडू आले. 'आता मी मरणार.' पण दामू अण्णा थांबले नाहीत. त्यांनी गाडी न्यूट्रलला टाकली. समोर उताराचा रस्ता होता. त्या 60 वर्षांच्या म्हाताऱ्याने ती ॲम्ब्युलन्स मागून 'ढकलायला' सुरुवात केली. पावसाची रिमझिम सुरू झाली होती. दामू अण्णा श्वास रोखून गाडी ढकलत होते. 1 किलोमीटर पुढे पेट्रोल पंप होता. त्यांच्या पायातली चप्पल तुटली, पायाला दगड लागून रक्त आले, पण ते थांबले नाहीत. ते रडत ओरडत होते, 'देवा. या पोराचा जीव नको घेऊ! माझ्या वाट्याचे आयुष्य त्याला दे, पण गाडी चालू दे!' कसेबसे ते पंपावर पोहोचले. त्यांनी खिशातले सगळे चिल्लर - अगदी 1-2 रुपयांचे नाणे काढून पंपावाल्याला दिले. 'भाऊ, हे घ्या 70 रुपये. लवकर डिझेल टाका. पोरगं मरतयं आत.' पंपावाल्याने डिझेल टाकले. दामू अण्णांनी गाडी सुसाट पळवली आणि रोहितला हॉस्पिटलमध्ये पोहोचवले. डॉक्टरांनी रोहितला तातडीने आय. सी. यू. मध्ये नेले. वेळेवर पोहोचल्यामुळे त्याचे प्राण वाचले. दुसऱ्या दिवशी सकाळी रोहितचे श्रीमंत वडील हॉस्पिटलमध्ये आले. त्यांनी डॉक्टरांचे आभार मानले. डॉक्टर म्हणाले, 'आभार माझे नका मानू. त्या ॲम्ब्युलन्सवाल्याचे माना. 10 मिनिटे उशीर झाला असता तर तुमचा मुलगा वाचला नसता.' रोहितचे बाबा बाहेर आले. त्यांनी पाहिले की दामू अण्णा हॉस्पिटलच्या बाकावर (Bench) बसले आहेत. ते दामू अण्णांजवळ गेले. त्यांनी 10 हजार रुपयांची गड्डी काढली. 'हे घ्या पैसे. तुम्ही माझ्या मुलाचा जीव वाचवलाय.' पण दामू अण्णा हालले नाहीत. त्यांची मान एका बाजूला कलली होती. रोहितच्या बाबांनी त्यांना हलवले. 'अहो? पैसे घ्या.' दामू अण्णांचा देह थंड पडला होता. ते गतप्राण झाले होते. तिथे उभ्या असलेल्या एका नर्सने डोळे पुसले आणि म्हणाली

'साहेब, ते उठणार नाहीत. त्यांचा मृत्यू 'हार्ट अटॅक' ने नाही, तर 'भुकेने' झालाय. गेल्या 3 दिवसांपासून त्यांनी अन्नाचा एक कणही खाल्ला नव्हता. ते हायवेवर लोकांकडे भीक मागायचे ना? लोक त्यांना शिव्या द्यायचे. पण जे 10-20 रुपये जमा व्हायचे, त्याची ते कधीच 'भाकरी' खात नसत. ते त्या पैशाचे फक्त 'डिझेल' टाकायचे. ते नेहमी म्हणायचे, 'माझे पोट रिकामे राहिले तरी चालेल, पण माझी ॲम्ब्युलन्स रिकामी नाही राहिली पाहिजे. माझा एकूलता एक मुलगा ॲम्ब्युलन्स वेळेवर न मिळाल्यामुळे मेला होता. दुसऱ्याचे पोर नाही मरू देणार मी.' 'काल रात्री तुमच्या मुलाला वाचवण्यासाठी त्यांनी जी ताकद लावली. त्यात त्यांची उरलीसुरली ऊर्जा संपली. त्यांनी स्वतःला जाळून तुमच्या वंशाचा दिवा वाचवलाय.' हे ऐकून रोहितच्या बाबांच्या हातातली पैशाची गड्डी जमिनीवर विखुरली. ते त्या 'भिकारी' समजल्या जाणाऱ्या मृतदेहाच्या पायाशी कोसळले आणि लहान मुलासारखे रडले. ज्याला समाज 'दारुडा' आणि 'भिकारी' म्हणून हिनवत होता, तो माणूस प्रत्यक्षात एक 'संत' होता, ज्याने स्वतःचा घास त्यागून माणुसकीचे इंजिन चालू ठेवले होते. रस्त्यावर मदत मागणाऱ्या प्रत्येक माणसाला 'भिकारी' समजू नका. काही लोक स्वतःसाठी नाही, तर समाजासाठी झोळी पसरत असतात. बाह्य रूपावरून माणसाची लायकी ठरवू नका. फाटक्या कपड्यातही देव असू शकतो. ■ ■

बसौसे ■ ■



## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### निळ्या नभाचा तारा निखळला

निळ्या नभाचा तारा निखळला
माजली किलबिल ही चोहीकडे
परखड वाणी खास स्वाभिमानी
झुकला नाही रे कधी कोणापुढे

चळवळीत नीत रणजीत योद्धा
भुलला ना कधी भीमा नि बुद्धा
बॅरिस्टरांचा अनुयायी मनोमन
उत्स्फूर्त खुले रिपब्लिकन धडे

सदा सजग तो प्रबोधनासाठी
नव्हत्या मनात किलमिश गाठी
धारदार वार विचार तीक्ष्ण प्रहार
कोडे भ्रमिष्टांचे मग गळून पडे

शूर शिपाई समाज परिवर्तनाचा
संताप मनात कुभांड वर्तनाचा
तर्कशुद्ध युद्धात लढला तत्वनिष्ठ
जेथे अन्यायदिवाणी पासली पडे

मुरीद त्यांचे अनुपम स्तरावर
शब्द लोभस घ्यायचे शिरावर
सारे म्हणायचे आदराने दादा
ओथंबले रे भीमक्रांतीचे पाढे

- प्रा. डॉ. मुकुंद गोपालराव मेश्राम

### वाटीभर साठी

शेंगा भुईमुंगाच्या,
होत्या उकडल्या छान
सजल्या पातेल्यात होत्या,
दिसत होत्या छान
पातेल्यापुढे होती,
बसली मंडळी तेथे
दाणे खात शेंगातील,
मिटक्या मारित तेथे
बघुनी शेंगांना त्या,
सुटले पाणी तोंडाला
बसलो मारून पालथी,
शेंगा त्या चाखण्याला
असता घेत आस्वाद,
शेंगातील त्या दाण्यांचा
पडला निसटून दाणा,
एक त्या शेंगीचा
लागले पूर्ण ध्यान माझे,
दाणा तो शोधण्यास
मंडळी होती गर्क,
शेंगा फस्त करण्यास
डोकावला विचार एक मनांत,
जीवन असेच असते
असुनी पाटीभर आनंद पुढ्यात,
वाटीभर साठी झुरत असते
वाटीभर साठी झुरत असते.

- चंद्रकांत सावळकर

### माणूसकीचा गर्भपात

ऐकू येत नाही कुठे
आज माणूसकीचा स्वर
फिरे घालून मुखवटे
माणसे ही वर वर

माणसांच्या गर्दिमध्ये
माणूसकी हरवली
भोवताली लांडग्यांची
कार्यशाळा भरवली

कुठे कुठेच घडतो
माणूसकीचा साक्षात्कार
माणसांचा माणूसकीवर
होतो रोज बलात्कार

माणूसकीला अवकाळी
येती प्रसुतीच्या कळा
माणसेच दाबतात
मग माणूसकीचा गळा

माणूसकी बदलली
बदलली रीतभात
माणसाने माणूसकीचा
आज केला गर्भपात...!!

- सुभाष मानवटकर
(निळं पाखरु)

### महाडचा सत्याग्रह आम्हा सांगतो

होतो आम्ही पाण्यापासून दूर
डॉ. बाबासाहेब तुम्ही केला सत्याग्रह
समतेची चळवळ झाली सुरु
माणसा माणसात विषमता झाली दूर..1..
समानतेचा उदय झाला
अज्ञानाचा नाश झाला
अंधरूढीच्या वेड्या मोकळ्या झाल्या
बहुजनाच्या जीवनात प्रकाश झाला..2..
जो मागे सरतो तो हरतो
जो ताठ मानेने उभा राहतो तो जिंकतो
बाबा नी, ताठ मानेने उभे राहा, शिकवले
मानव जातीद्वयते तुन मुक्त जाह्ले..3..
महाडचा सत्याग्रह आम्हा सांगतो
अन्यायाला वाचा फोडतो
विवेक जागृत ठेवून जगा
समते शिवाय मुक्ती नाही,आम्हा सांगतो..4..

- इंजि. शुद्धोधन बडवणे

### तुला पाहिले कि....

तुला पाहिले कि बरे वाटते,
हे खोटेच जीवन खरे वाटते ।।

नयनातून तारूण्य ओसंडतांना,
मिनाक्षी मदिरेचे झरे वाटते ।।

ओठातूनी शब्द मोती सांडतांना,
कंठहार मधले हिरे वाटते ।।

नको गालावरती केस पांघरु,
ते मुखचंद्रमावर चरे वाटते ।।

तुझा ओठ माझ्या ओठाशी भिडला,
मला स्वप्न झाले पूरे वाटते ।।

- मिलिंद खैरकर

